# प्रकरण चार

## महिला व बालकल्याण विभाग

**4.527 अंगणवाडी केंद्रांना जलशुध्दीकरण यंत्र पुरविणे बाबत.**

**पंचायत समिती सुधागड पाली, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती सुधागड पाली यांनी शासकिय निधीमधून महिला व बाल कल्याण विभागाने जलशुध्दीकरण यंत्र खरेदी 3,49,100/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.विकअ/1998/प्र.क्र.43,दिनांक 05/05/1999 अन्वये कंत्राटदाराच्या देयकातून 2% मुल्यवर्धीत कर रक्कम रूपये 17,455/- वसूल केलेला नाही.

2) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार सुरक्षा अनामत अंदाजपत्रकिय रक्कमेच्या 3 टक्के रक्कम इतकी असावी व देयकातून 7 टक्के रक्कम अशी एकूण 10 टक्के रक्कम सुरक्षा अनामत घेणे आवश्यक असतांना 5 टक्के रक्कम कपात केलेली असून उर्वरीत 5 टक्के रूपये 17,455/- कपात करणे आवश्यक आहे.

3) लाभार्थींच्या अर्जावर दिनांक नमुद नाही. तसेच पंचायत समितीला प्राप्त झालेबाबत आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही.

4) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-1040/प्र.क्र.14/कोषा-4/दिनांक 11 फेब्रूवारी 2000 नुसार 15 फेब्रूवारी नंतर खरेदी करावयाची नसतांना 15 फेब्रूवारी नंतर खरेदी झालेली आहे.

5) प्राप्त झालेल्या साहित्याचा तपासणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

6) शासन निर्णय दिनांक 02/01/1992 नुसार व्यापक प्रसिध्दी देण्यात आली नाही, त्यामूळे स्पर्धात्मक दराचा लाभ पंचायत समितीला झाला नाही.

7) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक 1007,दिनांक 22/02/2008 नुसार व

आयकर कपातीचे कलम 194 (सी) नुसार कंत्राटदाराच्या देयकातून 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक होते, परंतू लेखाशाखेने आयकर कपात केला नाही, रक्कम रूपये 6,982/- वसूल करून शासन खाती जमा करावी.

**4.528 शिवण व कर्तन प्रशिक्षणाबाबत.**

**पंचायत समिती मंडणगड, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** प्रमाणक क्रमांक 16,दिनांक 31/03/2015 ने रक्कम रुपये 37,500/- ओम शिवशक्ती शिक्षणसंस्था यांना तांत्रिक प्रशिक्षणासाठी प्रदान केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महर्षी कर्वे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, मंडणगड यांच्याकडून लाभार्थी यादीवर जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही. तसेच, पंचायत समिती स्तरावर यादी प्राप्त झाल्यावर आवक क्रमांक व दिनांक नाही.

2) प्रशिक्षण कालावधी, प्रशिक्षण केव्हा सुरु झाले इत्यादी बाबतचा तपशील नमूद नाही. उपस्थितीबाबत अहवाल, प्रवेश घेतल्याची पावती, प्रशिक्षण प्रमाणपत्र, लाभार्थींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतलेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र, शुल्क भरल्याची पोहोच पावती इत्यादी कागदपत्रे लेखा परिक्षणास आढळली नाहीत.

**4.529 MS-CIT संगणक प्रशिक्षण योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सावंतवाडी जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती सावंतवाडी महिला बालकल्याण विभागाने MS-CIT संगणक प्रशिक्षण योजनेसाठी जिल्हा परिषद, निधीतुनरक्कम रुपये 1,76,900/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-109/ प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 नुसार प्रपत्र अ मध्ये लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवली नाही.

2) योजनेसाठी निवड केलेल्या मुली सन 2014-15 पूर्वी संगणक परिक्षा पास झालेल्या असतांना त्यांना लाभ दिला आहे. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची रक्कम प्रति 3050 X 7 लाभार्थी = 21350/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) सविता प्रदिप पंडित व प्रतिज्ञा प्रकाश जाधव या लाभार्थ्यांचे धनादेश अद्यापपर्यंत आदा केले नाहीत.

4) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण संस्थेला सक्षम अधिकारी यांनी भेट दिलेबाबत निरिक्षण अहवाल उपलब्ध नाही.

5) प्रशिक्षणार्थींचे स्वतंत्र हजेरीपत्रक प्रशिक्षण संस्थेकडून उपलब्ध करुन घेतलेले नाही.

6) लाभार्थ्यांच्या विनियोग दाखले व पोहोच घेतलेल्या नाही.

**4.530 पंचायत समिती वाढीव उपकरातून महिला व बालकल्याणच्या 10 टक्के अनुदानातून कुपोषित बालकांना व गरोदर मातांना अतिरिक्त आहार पुरविणे योजनांतर्गत लोहयुक्त सिरप औषधे खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती नाशिक**, **जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** लोहयुक्त सिरप औषध खरेदी योजनेवर प्रमाणक क्रमांक 19,दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 4,30,000/- चा खर्च करण्यात आलेला आहे. सदर खरेदी प्रकियेत खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पंरास/ 1020/प्र.क.14/38, दिनांक 09/02/2001 तसेच परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार नियोजन व अंमलबजावणी तसेच ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार पंचायत समितीने योजना राबविलेली नाही.

2) पुरवठा आदेशानुसार आर्यन सिरप औषध 200 ml. च्या बाटलीत मागणी केलेली असतांना बिलात 60 ml. बाटलीत मालाचा पुरवठा केलेला आहे. परंतु साठा नोंदवहीत बीलाची तपासणी न करता 200 ml. चुकीची नोंद घेण्यात आलेली आहे.

3) औषध पुरवठा उत्पादक बॅच नंबर, उत्पादक महिना, व एक्सपायरी दिनांक नमूद नाही. म्हणजेच पुरवठा केलेले औषध वापरण्यायोगे व दर्जात्मक असलेबाबत दिसून येत नाही.

4) औषध पुरवठा केलेल्या बिलाचे टॅक्स इनव्हाईस न देता कन्साईनी इनवाईस घेण्यात आलेली आहे. यावरुन सदरची औषध खरेदी ही अधिकृत नाही असे लेखापरीक्षणात दिसून येते.

5) महाराष्ट्र शासन, उर्जा, उद्योग व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/ (2512)/उद्योग-6,दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद 8.6 (अ) (ब) (क) व (ड) नुसार व मार्गदर्शक सुचनानुसार गुणवत्ता व दर्जा तपासणी अहवाल नसतांना देयके पारीत करण्याचे प्रयोजन विशद करावे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 मधील नियम 98 आणि हॉस्पिटल मॅन्युअल खंड-1, चॉप्टर-26, परिच्छेद-18 प्रमाणे सक्षम अधिकारी यांनी माल सुस्थितीत प्राप्त झालेबाबत प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

7) औषध पुरवठा मुदतीत झालेची खात्री करता आली नाही.

**4.531 पंचायत समिती सेस निधीतून महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत संगणक प्रशिक्षण योजना राबविणेबाबत.**

**पंचायत समिती साक्री, जिल्हा धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 38) -** पंचायत समिती सेस निधीतून संगणक प्रशिक्षण देणेबाबत रुपये 1,34,000/- खर्च करुन योजना राबविण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2011/प्रक्र-76/पंरा-1,दिनांक 24/01/2014 नुसार समिती मार्फत राबविण्यात येणा-या योजनांना मंजूरी दिलेली असुन समितीने आवश्यक निकषासह मंजूर केलेल्या लाभार्थ्यांची यादी नस्तीत ठेवण्यात आलेली नाही.

2) सिस्टेल कॉम्प्युटर संस्था ही धुळे येथे आहे, या संस्थेची साक्री तालुक्यात शाखा नसतांना संस्थेने दुसऱ्या संस्थेशी करार पत्र न करता संस्थेच्या शाखा नसतांना विदयार्थांना कसे प्रशिक्षण दिलेले आहे, ही बाब स्पष्ट होत नाही.

3) सदर कामाची किंमत रुपये 50,000/- पेक्षा अधिक असल्याने शासन निर्णय दिनांक 02/01/1992 नुसार निविदा मागविण्यात आलेली नाही व कामाला प्रसिध्दी देण्यात आलेली नाही.

4) विदयार्थी हे ग्रामीण भागातील साक्री पासून 20 ते 25 किमी परिसरातील आहेत हे विदयार्थी त्यांच्या शाळेच्या वेळा सांभाळून प्रशिक्षणासाठी कसे उपस्थित होते, ही बाब स्पष्ट होत नाही, संस्थेचे वेळापत्रक व विदयार्थी उपस्थिती अहवाल घेण्यात आलेले नाहीत, प्रशिक्षणाचे देयक आगाऊ म्हणून प्रशिक्षण पूर्ण करण्यापूर्वीच अदा करण्यात आलेले आहे. संबंधित विदयार्थी प्रशिक्षणाला उपस्थित होते, याबाबत उपस्थिती अहवाल व संगणक परिक्षा उत्तीर्ण झालेबाबत उत्तीर्ण प्रमाणपत्र पंचायत समितीच्या दप्तरी ठेवण्यात आलेले नाही. बालविकास प्रकल्प अधिकारी, व पर्यवेक्षकिय अधिकारी यांनी प्रशिक्षणास भेटी दिल्याबाबतचे अहवाल दप्तरी नाहीत, त्यामुळे प्रशिक्षणासाठी करण्यात आलेला खर्च हा त्याच प्रयोजनासाठी झाला आहे याची पडताळणी करता आलेली नाही.

5) पुरवठा धारकाचे देयकावर सेवाकर क्रमांक नमुद नाही, या देयकातून आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 जे प्रमाणे 10 टक्के टी.डी.एस. कपात करण्यात आलेला नाही.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे उपस्थिती पत्रक, पर्यवेक्षकीय अधिकारी यांची भेट दिल्याबाबतचे अहवाल व विदयार्थी परिक्षा उत्तीर्ण झालेले आहेत याबाबत गुणपत्रक / प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

**4.532 उपकराच्या 10 टक्के योजनेतुन शिलाई मशिन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती पारोळा, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समिती उपकराच्या 10 टक्के योजनेतून शिलाई मशिन पुरविणेकरीता रक्कम रुपये 51,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1098/प्र.क्र.73/ 34,दिनांक 20/10/1999 व शासन निर्णय क्रमांक मागास 2001/प्र.क्र.408/34,दिनांक 20/4/2001 मधील निर्देशानुसार अनुज्ञेय लाभार्थ्यांची निवड केलेली नाही.

2) शासन निर्णय, क्रमांक मागास 2001/प्र.क्र.408/34 दिनांक 20/4/2001 क्रमांक 2 नुसार योग्य ती प्रसिध्दी देवुन सुचना / आक्षेप मागविलेले नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/1098/प्र.क्र. 597/34,दिनांक 5/10/1989 नुसार लाभार्थी मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/ वित्त-9,दिनांक 20/6/2008 अन्वये योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विहीत मुदतीत पुर्ण केलेली नाही.

5) शिलाई मशिन वाटप असून 6 शिलाई मशिन लेखापरिक्षण कालावधी पावेतो पडून आहेत. या अर्थी योग्य लाभार्थ्यांची निवड न केल्याचे स्पष्ट् होते. तसेच 10 टक्के लाभार्थी हिस्सा 4 लाभार्थ्यांकडून वसूल केलेला आहे. परंतू सदर रक्कम रुपये 2,040/- चा भरणा करण्यात आलेला नाही. तरी सदर अनियमिततेबाबत खुलासा करावा. व सदर रक्कमेचा त्वरित भरणा करण्यात यावा.

**4.533 उपकर निधीतून ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना ब्युटी पार्लर व शिवणकाम प्रशिक्षण देणे योजना राबविणेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती हवेली, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समिती हवेली यांनी उपकर निधीतून ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना ब्युटी पार्लर व शिवणकाम प्रशिक्षण देणेकामी प्रती तास प्रती प्रशिक्षणार्थी रूपये 27.50 प्रमाणे उपस्थितीनुसार परिगणित करून प्रमाणक क्रमांक 80, दिनांक 20/02/2015 अन्वये रूपये 18,40,450/- अदा करणेत आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 02/06/2008 मधील परिशिष्ट ई मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही. योजना राबविणेमध्ये दिरंगाई झालेली आहे.

2) सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणाच्या ठिकाणी प्रशिक्षणाच्या उपस्थितीपत्रकानुसार दिनांक व गटविकास अधिकारी यांचे दिनांक 13/02/2015 मधील अट क्रमांक 5 नुसार प्रशिक्षण वर्ग दिनांक 03/02/2015 ते दिनांक 31/03/2015 अखेर उपस्थिती दर्शविली आहे. मात्र सदरचे अभ्यासक्रम हे डिजीइटी अंतर्गत प्रशिक्षणार्थीची नोंदणी करुन त्यानुसार अंतिम प्रमाणपत्र परीक्षेस ऑन लाईन पात्र ठरतात. त्यानुसार प्रशिक्षणार्थीची नोंदणी,प्रशिक्षण कालावधी व त्यांची बॅच याचा तपशिल उपलब्ध झालेला नाही. प्रशिक्षणार्थीची उपस्थिती गृहीत धरुन प्रशिक्षण तास परिगणीत करुन देयक सादर करणे आवश्यक असतांना तशी परिगणना न केल्यामुळे VTP संस्थेस जादा अदा झालेली रक्कम वसुल करावी.

3) VTP संस्थेस अदा करणेत आलेल्या शुल्कामध्ये परीक्षा शुल्क समाविष्ट असताना देयक अदा करताना रूपये 800/- प्रती लाभार्थी परीक्षा शुल्क अदा केलेले आहे. त्यामुळे सदर देयकाद्वारे अदा झालेल्या एकूण 371 प्रशिक्षणार्थीना अदा केलेले परीक्षा शुल्क रक्कम रूपये 2,96,800/- जादा अदा झालेले आहेत.

4) गटविकास अधिकारी यांचे दिनांक 13/02/2015 मधील अट क्रमांक 5 नुसार प्रशिक्षण वर्ग दिनांक 03/02/2015 ते दिनांक 31/03/2015 पूर्वी चाचणी परिक्षेसह पूर्ण करण्यात यावे असे असतांना चाचणी परिक्षा प्रमाणपत्रानुसार एप्रिल/मे 2015 दरम्यान झालेने अनियमितता झालेली आहे.

5) गटविकास अधिकारी यांचे दिनांक 13/02/2015 मधील अट क्रमांक 8 नुसार प्रशिक्षण वर्गाच्या उपस्थितीपत्रकावर महिला बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे दौ-याचे वेळी तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे. असे असतांना उपस्थिती पत्रकावर कोठेही स्वाक्षरी दिसुन येत नाही त्यामुळे उपस्थिती योग्य असल्याचे दिसुन येत नाही

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/2239/31,दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र 73/34 दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र अ प्रमाणे विहीत नमुन्यातील लाभार्थी नोंदवही तयार करून मागासवर्गीय जातीनिहाय/ गावनिहाय व कुटूंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थीच्या नोंदी घेणे आवश्यक असताना अशाप्रकारची नोंदवही ठेवलेली नाही.यादीमधील एकाच कुटूंबातील दोन व्यक्तिंना एकाच वर्षी दुबार लाभ दिल्याने रक्कम रुपये 22,136/-वसुल करुन उपकर निधीत भरणा करावे.

7) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे मबाक/लेखा/070/2015,दिनांक 09/02/2015 चे तांत्रिक मान्यता आदेशातील अट क्रमांक 9 नुसार प्रशिक्षणार्थी मुली-महिलाचे वय18 वर्ष ते 45 वर्ष या दरम्यान असावे असे असताना प्रस्तावासोबत जोडण्यात आलेल्या शाळा सोडल्याचा दाखला/ ओळखपत्रानुसार एकूण 22 प्रशिक्षणार्थीचे वय 18 वर्षे पूर्ण नसताना त्यांना लाभ दिल्याने रक्कम रूपये 1,37,137/- वसुल करून उपकर निधीत भरणे आवश्यक आहे.

**4.534 10 टक्के महिला व बालकल्याण विभाग पंचायत समिती उपकर फंडातुन सौरकंदिल खरेदीतील अनियमितेबाबत.**

**पंचायत समिती आंबेगाव, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती आंबेगाव यांची सन 2014-2015 मध्ये 10 टक्के महिला व बालकल्याण विभाग पंचायत समिती उपकर फंडातुन 383 सौरकंदिल खरेदी करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबविताना महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे वेळापत्रक ठरवून दिलेले असतांना वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही न केलेने अनियमितता झालेली आहे.

2) श्रीमती नवनीता विलास गव्हाणे (साल) श्रीमती छाया तानाजी गव्हाणे (साल) श्रीमती कुंदा गणपत दिवेकर (पिंपळगाव) श्रीमती सुमन दत्तात्रय गुंजाळ (पिंपळगाव) श्रीमती अनिता शंकर एरंडे (थुगाव) यांचे उत्पन्नाचे दाखले प्राप्त नाही.

3) माहे मार्च 2015 अखेर 383 नग सौर कंदिलाचे वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे योजनेचा खरा हेतू साध्य न होता लाभार्थी वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे अनुदानाची रक्कम रुपये 8,16,939/-विनाकारण गुंतून पडली आहे.

**4.535 महिलांना संगणक प्रशिक्षण शुल्क देण्यातील नियमबाह्यतेबाबत.**

**पंचायत समिती इंदापूर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 35) -** पंचायत समिती इंदापूर यांनी महिला व बालकल्याण विभागाकडील महिलांना सन 2014-15 मध्ये एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रशिक्षण पूर्ण केलेल्यांना महाराष्ट्र ज्ञान मंडळ आकारीत असलेले शुल्क परत देणे योजनेच्या अंतर्गत प्रमाणक क्रमांक 438 दिनांक 31/03/2015 रक्कम रूपये 3,07,009/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक 2 नुसार लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील अथवा रूपये 50,000/- च्या आत उत्पन्न असलेला असावा .लाभार्थीच्या उत्पन्नाचा दाखला हा तहसीलदार यांचा घेणे आवश्यक असताना तलाठी यांच्याकडील दाखले घेण्यात आलेले आहेत.

2) लाभार्थी निवड ग्रामसभेमार्फत होणे आवश्यक असताना प्रस्तावासोबत ग्रामसभेच्या ठरावाची प्रत नाही.

3) लाभार्थी प्रस्तावाच्या छाननी मध्ये 9 लाभार्थी हे बारामती तालुक्यातील असताना नियमबाह्यपणे लाभ दिलेला आहे.

**4.536 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे योजना राबविणेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती बारामतीचे सन 2014-15 च्या लेखापरिक्षणात जिल्हा परिषद पुणे महिला बाल कल्याण विभागा मार्फत जिल्हा निधी मधून इयत्ता 7 वी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना सन 2014-2015 मध्ये संगणक प्रशिक्षण देणे ही योजना राबविणेत आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, यांचे आदेश क्रमाक जिप/मबाक/योजना/ 2/615/2014, दिनांक 19/04/2014 अन्वये योजनेच्या अटी व शर्त क्रमांक 3 नुसार 5 विध्यार्थीनी 1. कु. प्रियांका नागसेन साळवे, 2. कु. ठोकळ काजळ विजय, 3. कु. वृषाली दत्तात्रय रासकर, 4. कु. कांबळे अस्मिता सोमनाथ, 5. कु दुर्गुडे वैशाली शशिकांत यांनी फी भरणा केले बाबतच्या पावत्या प्रस्तावा सोबत जोडलेल्या नसल्याने महाराष्ट्र ज्ञान महामंडळ आकारीत असलेले शुल्क व लाभार्थी घेत असलेल्या प्रशिक्षणा साठी संगणक संस्था चालकानी आकारलेली फी यापैकी कमी फी बाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध न झालेने दिलेले अनुदान महाराष्ट्र ज्ञान महामंडळ आकारीत असलेले शुल्क पेक्षा जास्त नाही याची पडताळणी करता आली नाही.

2) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, यांचे आदेश क्रमाक जीप/मबाक/योजना/ 2/615/2014, दिनांक 19/04/2014 अन्वये योजनेच्या अटी व शर्त क्रमांक 5 नुसार 1. कु. जाधव प्रियांका दत्तात्रेय 2 कु. कोमल प्रकाश जगताप 3. कु. चव्हाण शीतल उमाजी 4 कु. क्षीरसागर सोनाल भगवान हया विदयार्थीनी दारिद्र्य रेषेखाली असल्या बाबतचे ग्रामसेवकाचे अथवा कामगार तलाठी याचे दाखले प्रस्तावा सोबत जोडलेले नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पी ए/2008/ प्रक्र-446/वित्त-9 मंत्रालय मुंबई 32,दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थीची निवड करुन विषय समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पी ए/2008/ प्रक्र-446/वित्त-9 मंत्रालय मुंबई 32, दिनांक 20/06/2008 परि.'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही. योजना राबविणेमध्ये दिरंगाई झाली आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/2239/31,दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन,ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्र.4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करून मागासवर्गीय जातीनिहाय/गावनिहाय व कुटुबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.त्याचप्रमाणे पंचायत समितीकडुन वैयक्तीक सहाय्य दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.त्यानुसार लाभार्थींच्या सर्व नोंदी जात व गाव निहाय व कुटुबनिहाय घेवुन शासन निर्णयातिल अ.क्र.1.5 मधिल 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबत ची पडताळणी सदर नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही. सदर लाभार्थींची मास्टर नोंदवही न ठेवल्याने एकाच योजनेचा लाभ 1. कु. वृषाली दत्तात्रय रासकर 2. कु. कोमल दत्तात्रय रासकर लाभार्थीस /कुटुंबात दुबार दिलेला आहे. सबब रक्कम रुपये 3,050/- वसूल करून जिल्हा निधीत भरणा करावी.

**4.537 90 टक्के अनुदानावर अंगणवाड्यांना सोलर कुकर वाटपातील अनियमितता.**

**पंचायत समिती भोर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 66) -** पंचायत समिती भोर,कृषी विभागाकडील सन 2014-2015 मध्ये उपकर निधीतुन 90 टक्के अनुदानावर 11 अंगणवाड्यांना 11 सोलर कुकर वाटप करण्यासाठी कृषी विभाग पंचायत समिती भोरने शासन मान्य दरकरार एजन्सीमार्फत खरेदी करण्याबाबत आदेश दिलेले असुन सदर योजनेची संचिका, प्रस्ताव व साठा नोंदवही याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे सहपत्र परिशिष्ट-इ नुसार योजनेचे वेळापत्रक ठरवुन दिलेले आहे. पंचायत समितीने या विहीत वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे शासनाचा विहित कालावधीत योजना राबविण्याचा हेतू साध्य झाला नाही.

2) सदर योजनेचा तांत्रिक मंजूरी आदेशामधील अटी नुसार साहित्य स्पेशिफिकेशन प्रमाणे असल्याबाबत चाचणी प्रमाणपत्र व अहवाल दप्तरी नाही.

3) ठरावामध्ये लाभार्थ्यांच्या नावानिशी मंजूरीचा ठराव नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स./1080/सीआर/1074/57,दिनांक 29/07/1989 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त झाला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 83 नुसार माल पुरवठा चलन नस्ती सोबत नसल्यामुळे सौर कूकर कधी प्राप्त झाले याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

6) सदर सोलर कुकर खरेदी करणेबाबतचा तांत्रिक मंजुरी आदेश नस्ती सोबत नाही.

7) सोलर कुकर प्राप्त झालेबाबत सबंधित अंगणवाडीची पोच पावती नाही. तसेच अंगणवाडीच्या जड संग्रह नोंदवहीस सोलर कुकरची नोंद केलेची सत्यप्रत नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक पंरास-1020/प्र.क्र.14/38,दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थ्यांच्या निवडीच्या निकषावर लाभार्थ्यांकडून सादर झालेली कागदपत्रे यांची काळजीपूर्वक छाननी प्रत्येक स्तरावर होणे गरजेचे आहे. ठरविलेल्या निकषांमध्ये न बसणारा लाभार्थी निवडणे किंवा प्रस्तावित करणे ही गंभीर अनियमितता आहे.

**4.538 ग्रामीण भागातील महिलांना 90 टक्के अनुदानावर पिठाची गिरणी पुरविणे.**

**पंचायत समिती वाई, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती वाई यांनी उपकर निधीतून महिला बालकल्याण लेखाशिर्षांतर्गत ग्रामीण भागातील महिलांना 90 टक्के अनुदानावर पिठाची गिरणी पुरविणेच्या योजनेसाठी रक्कम रुपये 13,83,350/- एवढा खर्च केला आहे.

1) सदर खरेदीसाठी ई निविदा प्रक्रिया करणेत आली असून मे. प्रियांका एंटरप्रायजेस, पुणे यांची रक्कम रुपये 18,950/- प्रतिनग दराची निविदा मंजूर करणेत आली. निविदा प्रक्रियेपूर्वी भावबंध दरकरारावर उपलब्ध पुरवठादार, त्यांचे दर, स्पेसिफिकेशन्स यांच्याशी तुलना करुन खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

2) प्राप्त 5 निविदा पैकी 2 निविदाकार अपात्र ठरविले आहेत. त्यापैकी मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांचे प्रतिनग रुपये 10,442/- एवढे दर महिला बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद सातारा यांनी स्विकृत केलेले आहेत. त्यामुळे प्रियांका एंटरप्रायजेस व श्रीनाथ जनरल स्टोअर्स, यांचे यंत्रातील फरकाबाबत स्पष्टीकरण करणे याबाबत अभिलेखे उपलब्ध नाहीत. तसेच मे. प्रियांका एंटरप्रायजेस यांना चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले व दर कमी करण्यात असहमती दर्शवूनही त्यांचे दर रुपये 18,950/- स्विकृत करण्यात आला. त्यामुळे रुपये 8,508/- प्रतिनग प्रमाणे 81 नग खरेदीसाठी रुपये 6,89,148/- एवढी जादा रक्कम आदा करण्यात आली आहे.

3) साठा नोंदवही पाहता अश्विनी चंद्रकांत दळवी व शिवाजी यशवंत मांढरे यांच्या स्वाक्षऱ्या अपूर्ण व त्रोटक असल्याने व अर्जावरील स्वाक्षरीबर हुकुम नसल्याने सदर लाभ दिल्याचे सिध्द होत नाही

4) प्रमाणक क्रमांक 33,दिनांक 31/03/2015 अनुसार 73 घरघंटीकरीता रुपये 18,950/- प्रमाणे रुपये 17,83,350/- प्रदान करण्यात आले आहे. 90 टक्केप्रमाणे अनुदान रुपये 12,45,015/- एवढी प्रदान आवश्यक असतांना त्यामुळे रुपये 1,38,335/- एवढे जादा प्रदान झाले आहे.

5) या निविदा प्रक्रियेतील निविदाकार अनुक्रमे 1.सिध्दांत ट्रेडिंग कंपनी, पुणे यांचे लेटर हेडवरील दुरध्वनी 020-26058300 आहे. कार्यालय पत्ता कसबापेठ विटेकरवाडा, पुणे-411011 असून, 2.प्रियांका एंटरप्रायजेस, पुणे यांचाही पत्ता 1453, कसबापेठ, दुरध्वनी क्रमांक 020-26058300 असा असून हे दोन्ही निविदाकार एकाच पत्त्यावरील व एकाच कार्यालयातील दुरध्वनी क्रमांकाचे आहेत. सबब हे दोन्ही फर्म एकच व्यक्ती असल्याने सदोष निविदा प्रक्रिया राबविली गेलेली आहे. त्याचप्रमाणे मान्य केलेले दर जादा असल्याने फेरनिविदा मागविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. निविदा प्रक्रिया राबविताना तांत्रिक बाबी व्यवस्थित न तपासता लिफाफा क्र.2 उघडल्याने पंचायत समितीने रुपये 6,89,148/- चे नुकसान झालेले आहे सदर नुकसानीची रक्कम वसूल करुन पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

**4.539 ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया कमकुवत व दुर्बल गरजू महिलांना शिलाई यंत्र पुरविणे.**

**पंचायत समिती खंडाळा, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती खंडाळा यांनी पंचायत समिती उपकर निधीतून शिलाई मशिन खरेदीसाठी रक्कम रुपये 1246287/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मध्ये नमूद केल्यानुसार विहीत वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक मागास/1089/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये प्रथम ग्रामसभेमध्ये लाभार्थीची निवड करुन तशा प्रकारच्या ठरावाने पंचायत समितीने मासीक सभेमध्ये ठरावाद्वारे सदर लाभार्थीची प्रथमत: निवड करुन अंतिम यादीस मंजूरी घेणे आवश्यक होते तथापि तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक पंरास 1084/सीआर/1633, दिनांक 19/01/1985 नुसार प्रथम लाभार्थी हिस्सा वसूल करणे बंधनकारक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

4) शिलाई यंत्राच्या मागणी अर्जाच्या प्रस्तावावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या घेणेत आलेल्या नाहीत. उदा. आशा मधुकर मोटे (धनगरवाडी).

5) एकूण 357 शिलाई यंत्राची मंजूर यादी लेखापरिक्षणास पहावयास मिळाली नाही. लाभार्थी यादीस पंचायत समिती सभेची मान्यता न घेता नियमबाहयपणे वाटप केलेले आहे. सदोष पध्दतीने योजना राबविलेली असून लाभार्थी हिस्सा दिनांक 09/10/2015 अखेर जमा झाला आहे. सदर 50 टक्के रक्कम मिळाल्याची पुरवठादाराची पोहोच पावती उपलब्ध नाही. ती उपलब्ध करणे आवश्यक आहे.

6) शिलाई यंत्राचा कंपनी मॉडेल क्रमांक नमुद केलेला नाही. तसेच सदर यंत्राची शासकीय तंत्रनिकेतन अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडून तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

7) संचालक समाजकल्याण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील आदेश क्रमांक सकवि/तसंमस-20/99/2000/का-20/सातारा/पुणे-1/979, दिनांक 09/10/2000 मधील अट क्र.5 नुसार मशीन वाटपासंबंधी वयाची मर्यादा 18 ते 40 असणे आवश्यक आहे तथापि सौ. आशा वसंत धायगुडे यांचे वयाचा दाखला जोडलेला नाही. त्यामुळे वय समजून येत नाही.

1. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक मागास/पंरास/1098 प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये विहीत नमुन्यात नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे. तशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही तसेच गटविकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष पहाणी करुन उद्दीष्टपूर्तीबाबत अहवाल दिलेला नाही.

**4.540 50 टक्के अनुदानावर 3एच.पी. ओपनवेल विद्युत पंप खरेदी करुन पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती फलटण, जिल्हा परिषद सातारा यांनी पंचायत समिती सेस निधीतून 3 एच.पी. ओपनवेल विद्युत पंप खरेदीसाठी रक्कम रुपये 6,18,750/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास-1084/सीआर/ 1633/57,दिनांक 17/07/1985 अन्वये खरेदीपूर्वी लाभार्थी हिस्सा जमा करुन योजना राबविणे आवश्यक असतांना लाभार्थी हिस्सा जमा न करताच खरेदी केली आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग क्रमांक भांखस1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे दुबार लाभाची पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय पंरास-1084/सीआर/ 1633 /57, दिनांक 19/07/1985 अन्वये खरेदीपूर्वी लाभार्थी निश्चित करुन मंजूरी घेऊन राबवावयाची असतांना मागणी प्रस्ताव हे लाभार्थी निवडीनंतरचे आहेत.

4) मागणी प्रस्तावावर दुबार लाभासंबंधी प्रमाणकावर कृषी अधिकारी यांच्या स्वाक्षरी नाहीत.

5) लाभार्थी पात्र असल्याबाबत गटविकास अधिकारी यांनी प्रमाणीत केले नाही.

6) डिलेव्हरी चलनावर दिनांक नमूद नाही.

**4.541 जिल्हा परिषद स्विय निधीतून शिवणकाम व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षणावरील खर्चाबाबत (जि.प.स्विय निधी)**

**पंचायत समिती कडेगाव, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती कडेगाव यांनी जिल्हा परिषद स्वीय निधीतून शिवणकाम व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण देणे या कामासाठी रक्कम रुपये 20,000/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हनुमंत यादव व प्रणाली लालासो महाडीक या लाभार्थ्यांनी प्रशिक्षण शुल्क भरल्याची पावती उपलब्ध झाली नाही.

2) लाभार्थी मंजुरीचे पत्र व महिला बालकल्याण समितीचे ठरावाची प्रत नाही.

3) लाभार्थ्यांनी कोर्स पूर्ण केलेचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

**4.542 साडी खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कडेगाव, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** पंचायत समिती कडेगाव यांनी प्रमाणक 7, रुपये 17,38,25/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) पंचायत समिती कडेगाव व महिला बालकल्याण समितीचे ठराव प्रत नाही.

2) अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी सेविका यांचे उपयोगिता प्रमाणपत्र नाही.

वरील उणीवांच्या पूर्तता अभावी रक्कम रुपये 1,73,825/- लेखापरीक्षणात तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

**4.543 महिला समुपदेशन खर्चाबाबत (महिला व बाल कल्याण विभाग).**

**पंचायत समिती गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती गडहिंग्लज, महिला व बाल कल्याण विभागाने महिला समुपदेशन करिता रक्कम रुपये 1,14,000/- इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची प्रशासकीय मंजूरी व तांत्रिक मंजूरी घेण्यात आली नाही.

2) युवा मंच महिला समुपदेशन केंद्र ऐनापूर यांना कार्यालयीन आदेश दिल्याचे आढळून आले नाही.

3) सदर योजना ठराव क्रमांक 362,दिनांक 24/12/2014 अन्वये मंजूर झाल्याने दिनांक 01/04/2014 ते डिसेंबर 2014 या कालावधीतील 9 महिन्याचे रुपये 9,500/- प्रमाणे एकूण रक्कम 85,500/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

4) एक समुपदेशन व एक विधी सल्लागार नियमितपणे हजर असलेबाबत व समुपदेशन केलेली प्रकरणे याचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध होणे आवश्यक आहे.

**4.544 ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुले व मुलींना सायकल पुरवठा करणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** पंचायत समिती मंगळवेढा यांचे कडील सन 2014-2015 या लेखापरीक्षण कालावधीत पंचायत समिती उपकर निधि मधून समाजकल्याण विभागाअंर्तगत तालुक्यातील ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुले व मुलींना सायकल पुरवठा करणेकरीता रक्कम रूपये 2,61,468/- एवढा खर्च केलेला आहे.

1) सदर योजना राबविताना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-09 मुंबई 32,दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद / पंचायत समितीने राबविलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना नमुद केलेल्या असुन त्यामधील परिशिष्ठ ड नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील लाभार्थ्यांची निवड 31 जुलै अखेर होणे आवश्यक आहे. तसेच साहित्य खरेदी कामी पुरवठा आदेश 30 नोव्हेंबर अखेर देऊन साहित्य वाटप जानेवारी अखेर पुर्ण करुन पुरवठादाराचे देयक माहे फेब्रुवारीमध्ये अदा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक 1089/ प्र.क्र./55/34 दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तीक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थींची मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. ती ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे एकाच कुटुंबातील एकापेक्षा अनेक व्यक्तींना म्हणजेच दुबार लाभ दिला गेला नसलेबाबतची तपासणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर/ 1088/सीआर786/30,दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्या वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता पंचायत समितीने सदर साहित्याचे वाटप पुढील आर्थिक वर्ष सन

2015-2016 मध्ये दिनांक 08/04/2015 ते दिनांक 27/08/2015 या कालावधी अखेर करण्यात आलेली आहे.म्हणजेच सन 2014-2015 मध्ये साहित्याचे वाटप न केल्याने सदर आर्थिक वर्षामध्ये लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ न मिळाल्याने सदर योजनेचा उद्‌देश सफल झालेला नाही.

4) ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलांना पुढील आर्थिक वर्ष 2015-2016 मध्ये सायकलीचे वाटप केलेले आहे. परंतु दिनांक 12/11/2015 या चालू लेखा परीक्षण कालावधी अखेर मुले सायकली 14 नग व मुलींच्या सायकली 9 नग असे एकूण 23 सायकली संबधित लाभार्थ्यांना वाटप न करता पंचायत समिती स्तरावर शिल्लक असल्याचे आढळून आले आहे.तरी खालील नमूद केलेनुसार शिल्लक साहित्यापोटी रक्कम रुपये 72,608/- नाहक गुंतून पडलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम आजअखेरचे व्याजासह वसूल करुन पंचायत समिती उपकर निधी मध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

5) सर्व लाभार्थीच्या मागणी प्रस्तावावर मा. गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तरी प्रस्तावास मंजूरी नसताना संबंधीत लाभार्थीना सायकलींचे काय आधारे वाटप करण्यात आल्या. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

6) पुरवठा झालेल्या सायकली हया आयएसआय मार्कच्या असल्याबाबत व सदरच्या सायकली पुरवठा आदेशाप्रमाणे पंचायत समिती स्तरावर संबंधित सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

### 4.545 10 टक्के महिला बलकल्याण विभागा अंतर्गत सर्वसाधारण महिलांना स्वयं रोजगारासाठी शिलाई मशीन खरेदी व वाटपाबाबत.

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती मंगळवेढा ने सन 2014-2015 पंचायत समिती उपकर अंर्तगत तालुक्यातील सर्वसाधारण महिलांना शिलाई मशीन पुरवठा करणे करिता 10 टक्के महिला बाल कल्याण या लेखा शिर्षा अंतर्गत रक्कम रूपये 80,293/- एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

1) सदर योजना राबविताना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-09 मुंबई 32, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद / पंचायत समितीने राबविलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना नमुद केलेल्या असुन त्यामधील परिशिष्ठ क्रमांक ड नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील लाभार्थ्यांची निवड 31 जुलै अखेर होणे आवश्यक आहे. तसेच साहित्य खरेदी कामी पुरवठा आदेश 30 नोव्हेंबर अखेर देऊन साहित्य वाटप जानेवारी अखेर पुर्ण करुन पुरवठादाराचे देयक माहे फेब्रुवारीमध्ये अदा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक 1089/ प्र.क्र./55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तीक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थीची मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. ती ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे अनेक व्यक्तींना दुबार लाभ दिला गेला नसल्याबाबतची तपासणी करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमाक डीपीआर/ 1088/सीआर 786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्या वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना पुढील आर्थिक वर्ष सन 2015-2016 मध्ये दिनांक 08/10/2015 अखेर 17 नग शिलाई मशीनचे वाटप कलेले आहे. म्हणजेच साहित्याचे वाटप सन 2014-2015 या आर्थिक वर्षात न झाल्याने योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर/ 1088/सीआर 786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्या वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना पुढील आर्थिक वर्ष 2015-2016 मध्ये दिनांक 08/10/2015 अखेर एकूण 23 नग शिलाई मशीन पैकी 17 नग शिलाई मशीन चे वाटप केलेले आहे व उर्वरित 6 शिलाई मशीन लेखा परीक्षण कालावधी अखेर

वाटपाविना शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे प्रती नग रुपये 3,491/- प्रमाणे एकूण रक्कम रूपये 20,946/- नाहक गुंतून पडलेली आहे. त्यांमुळे सदरची रक्कम आजअखेरचे व्याजासह वसूल करुन पंचायत समिती उपकर निधी मध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

5) सर्व लाभार्थींच्या मागणी प्रस्तावावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तरी प्रस्तावास मंजूरी नसताना संबंधीत लाभार्थींना मशीन काय आधारे वाटप करण्यात आल्या. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

6) पुरवठा झालेल्या शिलाई मशीन हया आयएसआय मार्कच्या असलेबाबतचा तपासणी अहवाल घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच त्या शिलाई मशीन पुरवठा आदेशाप्रमाणे प्राप्त झाल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

**4.546 पंचायत समिती मोर्शी येथे महिला व बालकल्याण विभागाद्वारे वित्त शाखेसोबत संगणमत करुन अधिकारी व कर्मचारी याचेकडून करण्यात आलेल्या सिद्व अपहाराबाबत. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती मोर्शी, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6)** - सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे पंचायत समिती मोर्शी अंतर्गत महिला व बालकल्याण विभागात झालेल्या अपहाराबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 13 दिनांक 05/06/2014 रक्कम रुपये 3,76,200/- नुसार श्रीमती कुसुम वैद्य, सेवानिवृत्तं पर्यवेक्षिका यांना अर्जित रजेचे रोखीकरण प्रदान करण्यात आलेले आहे. याआधी प्रमाणक क्रमांक 153 दिनांक 20/02/2013 रक्कम रुपये 3,19,320/- व प्रमाणक क्रमांक 9 दिनांक 04/06/2013 रक्कम रुपये 3,22,480/- याप्रमाणे अर्जित रजेचे प्रदान करण्यात आलेले आहे. मात्र सदर रक्कंम संबधितास प्रदान केल्याबाबतचे अधिकृत अभिलेखे उपलब्धं नाही.

2) श्रीमती रेखा गवई यांचे वैद्यकीय देयक प्रमाणक क्रमांक 50 दिनांक 09/09/2014 रक्कम रुपये 92,535/- व प्रमाणक क्रमांक 51 दिनांक 09/09/2014 रक्कम रुपये 97,519/- असे एकुण रुपये 1,90,053/- आहरीत करण्यात आले आहे. मात्र संबधित कर्मचाऱ्यांने रुपये 22,818/- व रक्कम रुपये 14,659/- असे एकुण रक्कम रुपये 37,477/- ऐवढया रकमेचे देयके सादर केलेली आहे. मागणीपेक्षा रक्कम रुपये 1,52,576/- जादा आहरीत करण्यात आले आहेत. संबधितांनी सादर केलेल्या 37,477/- च्या देयकाच्या अनुषंगाने संबधिताचे खात्यात रुपये 34,129/- ऐवढी रक्कंम जमा करण्यात आल्याने रक्कम रुपये 3,348/- चे कमी प्रदान झाल्याने एकुण रुपये 1,55,924/- चा अपहार करण्यात आलेला आहे.

3) श्रीमती रेखा वानखडे यांना प्रमाणक क्रमांक 22 दिनांक 27/06/2014 अन्वये रक्कम रुपये 61,539/- आश्वासित योजनेबाबत रक्कम आहरित करण्यात आलेली आहे मात्र प्रमाणक क्रमांक 47 दिनांक 20/09/2013 नुसार रक्कम रुपये 50,484/- संबधिताचे बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. त्यामुळे संगणमताने दुबार शोधन करण्यात आले आहे.

4) श्रीमती लिला सुखदेवे यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत प्रमाणक क्रमांक 66 दिनांक 13/10/2014 अन्वये रुपये 66,623/- ऐवढया रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. मात्र सदर योजनेचे प्रदानासाठी प्रमाणक क्रमांक 83 दिनांक 25/11/2013 अन्वये रक्कम रुपये 51,745/- चे यापुर्वीच शोधन करण्यात आल्याने रकमेचे दुबार प्रदान करण्यात आले आहे.

5) प्रमाणक क्रमांक 65 दिनांक 13/10/2014 रक्कम रुपये 3,72,020/- अन्वये श्रीमती शिल्पा गोस्वामी व श्रीमती अरुणा ढोंगे या तोतया कर्मचाऱ्यांच्या नावे सहाव्या वेतन आयोगाचा हप्ता क्रमांक 3,4,5 चे थकबाकी प्रदान केले आहे.

उपरोक्त बाबीनुसार सन 2014-2015 या वित्तीय वर्षात रक्कम रुपये 12,21,006/- ऐवढया रकमेचा अपहार झाल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येते.

**4.547 महिला व बालकल्याण अंतर्गत वाहनावर केलेल्या खर्चाबाबत. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती भातकुली, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती भातकुली अंतर्गत महीला व बालकल्याण विभागाच्या वाहन क्रमांक 6551 साठी इंधन व दुरुस्तीवर रक्कम रुपये 82,273/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 93, उपप्रमाणक क्रमांक 70526 दिनांक 25/11/2014 नुसार 7.69 लिटर डीझेल खरेदी केले आहे परंतू त्याची लॉगबुकला नोंद नाही.

2) प्रमाणक क्रमांक 96, उपप्रमाणक क्रमांक 044 दिनांक 26/06/2014 अन्वये वाहन दुरुस्तीवर रक्कम रुपये 12,490/- खर्च करण्यात आला.परंतु लॉगबुक नुसार दिनांक 26/06/2014 रोजी सकाळी 8.00 ते 21.00 पर्यंत दौरा दर्शवला आहे.

3) सदर वाहनावर सन 2014-2015 मध्ये 1047 लिटर डीझेल वापर झाला असून वाहन एकूण 9893 धावले आहे. त्यामुळे वाहनाची सरासरी धाव 9 किलोमीटर प्रती लीटर इतकी कमी असल्याने इंधनावर जादा खर्च होत आहे.

**4.548 75 टक्के अनुदानावर मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन वाटप योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती राळेगाव, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 37) -** 75 टक्के अनुदानावर मागासवर्गीय महीलांना शिलाई मशीन वाटप करण्याकरीता रक्कम रुपये 74,850/- च्या शिलाई मशीन खरेदी करण्यात आल्या. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस/1093/2635/उद्योग-6,दिनांक 16/07/1993 अन्वये जास्त खपाच्या वृत्तपत्रात जाहीरात देणे आवश्यक असतांना केवळ दरपत्रके मागविल्याचे निर्दशनास येते.

2) प्राप्त झालेल्या दरपत्रकामध्ये जय जगदीश सेल्स, अकोला या पुरवठादाराचे नाव नमुद नसून युनिटेक एंटरप्राईजेस, अकोला या पुरवठादाराचे दर नमुद केले आहे.

3) दरपत्रके उघडतांना लिफाफावर अधिकृत एजंसी धारक असल्याचा पुरावा देणे आवश्यक असतांना पुरावा घेतला नाही.

4) तीनही दरपत्रकावर दिनांक नमुद नाही.

5) निविदा सुचनेतील अटीनुसार अधिकृत एजंसी धारक असल्याचा पुरावा देणे आवश्यक असतांना पुरावा घेतला नाही.

6) 30 नग शिलाई मशीन पैकी 27 नग शिलाई मशीन वाटप करण्यात आल्या परंतू उर्वरीत 3 शिलाई मशीन लेखापरीक्षणाच्या शेवटच्या तारखेपर्यत वाटप करण्यात आलेल्या नाही.

7) साठा नोंदवही पान क्रमांक 29 वर 5 शिलाई मशीन एकाच व्यक्तीने नेल्याचे त्यांचे स्वाक्षरीवरुन दिसून येते.

8) लाभार्थ्यांच्या अर्जावरील स्वाक्षरी व साहीत्य प्राप्त करतेवेळी साठा नोंदवहीवर केलेली स्वाक्षरी यामध्ये फरक दिसुन येतो. त्यामुळे ज्यांनी अर्ज केला त्यांनाच साहीत्य प्राप्त झाले कींवा नाही यांची खात्री पटत नाही.

**4.549 पंचायत समिती सेस अंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांना 90 टक्के सुटीवर शिलाई मशीन पुरविणे.**

**पंचायत समिती झरीजामणी, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3)** - मागासवर्गीय लाभार्थ्यांना 90 टक्के सुटीवर शिलाई मशिन पुरविणे रक्कम रुपये 4,50,000/-चे खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 99 अ नुसार प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी आदेश क्रमांक व दिनांक नमुद नाही.

2) लाभार्थी अर्ज / जन्म तारखेचे पुरावे तसेच शिलाई मशीन प्रशिक्षण प्रमाणपत्र यांत विसंगती असून लाभार्थ्यांच्या जन्मापुर्वीचे प्रमाणपत्र सादर केले तसेच इतर लाभार्थ्यांचे वय हे शिलाई मशीन प्रशिक्षणा करीता संयुक्तिक नाही.

3) शिवणकला प्रशिक्षक प्रमाणपत्रावर उपरिलेखन करुन झेरॉक्स प्रति जोडणेत आल्या असुन इतरांची प्रमाणपत्रांचा वापर करुन लाभ घेतला असल्याचे निदर्शनास येते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्रमांक 1093/प्र.क्र. 1239,दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्याना लाभ दिलेबाबत नोंदी मास्टर नोंदवही मध्ये ठेवणेत आलेले नाहीत. त्यामुळे दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सक्षम प्राधिकाऱ्यांनी लाभार्थी अर्जाची तपासणी / शाहनिशा न करता मोघम स्वरुपात शिलाई मशिन वाटप केल्यामुळे 12 नग*3491=41,892/- रुपये वसुलीस पात्र ठरते.

**4.550 महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत ग्रामीण भागातील 5 वी ते 9 वी वर्गात शिकत असलेल्या शालेय मुलींना 90% अनुदानावर सायकल पुरविणे (संकीर्ण संवर्गासाठी). (पंचायत समिती सेसफंड)**

**पंचायत समिती आर्वी, जिल्हा वर्धा, सन 2014 - 2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, आर्वी पुरवठा आदेश क्रं.पसंआ/ पंचा/से.फ./पु.आ./वाशि/71/138/2015 दिनांक 19/01/2015 नुसार 122 लाभार्थ्यांसाठी सायकल दर रुपये 3,605/- प्रती नग प्रमाणे लक्ष्मी सायकल स्टोअर्स, वर्धा यांना आदेश देण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) Director of Industries Mumbai यांचे पत्र क्रं.SPC/RCT/Bicycle/12/2014-2015/C-383 दिनांक 20/01/2015 यांचे निर्गमित केलेल्या RC नुसार Black Colour सायकलची किंमत रुपये 3,096/- निर्धारित करण्यात आलेली आहे. परंतु जिल्हा परिषद, वर्धा द्वारे मंजुर व खरेदी करण्यात आलेल्या सायकलची किंमत रुपये 3,605/- आहे. सदर खरेदीकरिता पंचायत समिती स्तरावरुन निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन अथवा उपरोक्त RC चा आधार घेतला असता तर रूपये 62,098/- ची बचत झाली असती.

2) पुरवठादाराकडून 2.26% दराने आयकर रुपये 9940/- ची कपात केली नाही.

3) योजनेचा लाभ देण्याकरीता शाळेपासून अंतर 2 कि.मी. चे वर असणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत शौचालय प्रमाणपत्र, वार्षिक उत्पन्न रुपये 32,000/- पर्यंत असल्याचे प्रमाणपत्र, ग्रामसभा ठराव, स्थान नमूद करणे, कर भरल्याची नमुना 10 पावती ची प्रत, मुख्याध्यापकाचे अर्जासोबत प्रमाणपत्र व विद्यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. परंतु तपासणीसाठी लाभार्थ्यांचे अर्ज उपलब्ध केले नाहीत.

4) सायकलचा पुरवठा केल्याबाबतचे Delivery Memo उपलब्ध नाहीत.

5) लाभार्थी यादी सभापती व गट विकास अधिकारी, आर्वी यांनी मंजूरी दिलेली व स्वाक्षरी केलेली प्रत तपासणीसाठी नस्तीत आढळली नाही.

6) नियमानुसार लाभार्थ्यांची निवड 1 मे पुर्वी होणे आवश्यक आहे.

7) उपयोगीता प्रमाणपत्र व मुल्यमापन अहवाल सादर केला नाही.

8) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही सादर केली नाही.

9) लाभार्थ्यांकडून 10 टक्के रक्कम कधी प्राप्त झाले याची नस्तीवरुन पडताळणी करता आली नाही. तरी संबंधिताकडून एकूण रुपये 72,038/- वसुल होणे आवश्यक आहे.

**4.551 जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील मुलींना संगणक प्रशिक्षण देण्याबाबतची अनियमितता. (सेस फंड).**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद सेस निधीतून 90 टक्के अनुदानावर आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील मुलींना संगणक प्रशिक्षण योजना राबविण्यात येऊन रोख पुस्तकात खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- झेडपीए-3008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 तसेच शासन परिपत्रक क्रमांक-झेडपीए/2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 अन्वये जिल्हापरिषदेकडील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्याबाबतचे वेळापत्रक असून, त्यात 30 सप्टेंबर पुर्वी लाभार्थी निवड करणे, तसेच वेळेत लाभार्थी हिस्सा वसुल करणेबाबत नमुद असून त्यानुसार निर्देशाचे पालन झाले नसल्याचे दिसून येते.

2) नस्तीतील नमुद लाभार्थी यादीनुसार प्राप्त निवडक अर्जाची तपासणी केली असता त्यात त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यानुसार सर्वसाधारणपणे अर्जदाराच्या अर्जावर सादर दिनांक नमुद नाही, गट विकास अधिकारी यांची अर्जावर शिफारस करण्यात येत असल्याबाबत स्वाक्षरी नाही. काही अर्जाच्या तपशिलात महत्त्वाच्या त्रुटी आढळून आल्या आहेत.

3) सदर योजना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र. 76/पंरा-1, मुंबई 400001, दिनांक 24/01/2014 अन्वये ईयत्ता 7 ते 12 वी पास मुलींना MS-CIT प्रशिक्षण देणेसाठी सदरहु योजना उपयुक्त राहील असे नमुद आहे. परंतु योजना राबवितांना त्याप्रमाणे कार्यवाही होत असल्याचे दिसून आले नाही.

4) रतन कॉम्प्युटर, पुलगांव यांचे मंजुर अंतर्गत असलेला लाभार्थी कु. रत्नमाला ज्ञानेश्वर बेंडे, नाचणगाव यांची जिल्हा परिषद कडून प्राप्त मंजुर लाभार्थी यादीत जात SC नमुद आहे व संस्थेच्या मंजुर यादीत ST दाखविण्यात आली आहे. परंतु जिल्हा परिषदेकडून प्राप्त अनुदान हे जिपसेस, विशेष घटक् योजना व ओटीएसपी लाभार्थीकरिता लाभार्थीच्या संख्येनिहाय प्राप्त झाले आहे. त्यामुळे सदर योजना करिता नमुद लाभार्थी संख्येत एकूण ओ.टी.एस.पी. लाभार्थी संख्येत एक लाभार्थी जादा नमुद केल्याचे दिसून येते.

5) प्रो. कविता कॉम्प्युटर एज्येकेशन, देवळी यांचे दिनांक 20/07/2015 चे पत्रासोबत प्राप्त लाभार्थ्यांची तपशीलवार माहिती जसे, विदयार्थी परिक्षा पास/ नापास/ अनुपस्थिती बाबतची माहिती, सादर करण्यात आली. त्यात नमुद केल्याप्रमाणे एकूण 23 लाभार्थी नापास व 15 लाभार्थी अनुपस्थिती असल्याने सदर लाभार्थ्यांची रक्कम एकूण रूपये 1,14,570/- निष्फळ खर्च केल्याचे निदर्शनास येते. तसेच सदर 15 लाभार्थी परिक्षेस अनुपस्थित असण्याबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

6) प्रो. कविता कॉम्प्युटर एज्युकेशन, देवळी वगळता उर्वरीत 7 प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थ्यांचे रिझल्ट शीट सुध्दा सादर करण्यात आले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात किती विदयार्थी परिक्षेला बसविण्यात आले होते, किती पास झाले, किती नापास झाले व किती अनुपस्थित होते याबाबत माहिती कळू शकली नाही. त्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल झाला किंवा नाही याची शहानिशा करता आली नाही.

7) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक- मागास1089/ प्र.क्र. 565/ 34, दिनांक 05/10/1989 तथा दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू ती लेखापरिक्षणाकरिता सादर करण्यात न आल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळू शकतो.

8) जिल्हा परिषद कडून प्राप्त लाभार्थी यादीत एकूण संख्या 137 असून त्यानुसार फक्त एकूण 134 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. उर्वरीत 3 लाभार्थ्यांचे एकूण रूपये 9,045/- जिल्हा परिषदेला परत करणे आवश्यक आहे.

9) सदर संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रम लाभार्थ्यांने यशस्वीरित्या पूर्ण केल्याबाबत त्याचे संगणक प्रशिक्षण प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना ते सादर करण्यात आले नाही. त्यामुळे सदर योजना यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे निष्पन्न होत नाही.

**4.552 90 टक्के अनुदानावर महिलांना शेवई मशिन पुरवठा करणेबाबत. (पंचायत समिती सेसफंड)**

**पंचायत समिती समुद्रपुर, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समितीने पंचायत समिती सेस फंडातून 18 महिला व बालकल्याण अंतर्गत 90 टक्के अनुदानावर महिला लाभार्थीना 6 नग शेवई

मशीन वाटप करण्याकरिता मे. गायत्री महिला गृह उद्योग बोरटा, ता.मुर्तीजापूर यांना 90 टक्के रक्कम रुपये 1,96,803/- प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन शुद्धिपत्रक, क्रमांक झेडपीए/210/ अनौसक्र/ 33/प्रक्र 168/पंरा-1 दिनांक 22/07/2011 मधील परिच्छेद क्रमांक 3 नुसार साहित्य खरेदीच्या योजनेत प्रती महिला जास्तीत जास्त 20,000/- खर्च करता येते. परंतु पंचायत समितीने सदर शासन निर्णयाचे पालन न करता प्रती महिला 32,800/- खर्च केले आहे. तरी जास्तीचा खर्च रक्कम रुपये 76,803/- संबंधिताकडून वसूल करण्यात यावे.

2) महाराष्ट्र शासन शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2013/प्र.क्र.49/पंरा-7 दिनांक 07/02/2013 नुसार 1 लाख व त्यापेक्षा अधिक किमतीचे साहित्य खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा असे निर्देश दिले असताना, पंचायत समितीने ई-निविदा प्रक्रिया न राबविता, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया राबविली आहे. उपरोक्त शासन परिपत्रकाचा अवलंब न करता खरेदी करण्यात आलेली साहित्य लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही.

3) गायत्री महिला गृह उद्योग बोरटा, ता. मुर्तीजापूर हे शेवई मशीन पुरवठा करण्याकरिता अधिकृत असल्याबाबत महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित यांचे प्रमाणपत्र नाही.

4) खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची तपासणी अहवाल प्राप्त करण्यात आला नाही.

5) योजना कार्यान्वित करण्यापूर्वी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त 09, दिनांक 30/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे राबविण्याबाबत वेळापत्रक ठरवून दिले असून त्यानुसार कार्यवाही न करता अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार रक्कम खर्ची दर्शविण्यासाठी सन 2014-2015 मध्ये फक्त साहित्य खरेदी करण्यात आले आहे. लाभार्थ्यांना साहित्याचा लाभ हा मार्च 2015 नंतर देण्यात आला आहे यामुळे हि संपूर्ण योजना सन 2014-2015 मध्ये राबविण्यात आली नाही.

6) शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग, क्रमांक पंरास/1084/सीआर 1633/57 दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम वसूल करूनच योजना राबविणे आवश्यक असताना सन 2014-2015 या वित्तीय वर्षात लाभार्थी हिस्सा प्राप्त करण्यात आला नाही. त्यामुळे लेखापरीक्षण कालावधी दिनांक 19/09/2015 पर्यंत 3 नग साहित्य साठा पुस्तिकेत शिल्लक आहे.

7) पंचायत समितीने गावनिहाय व योजनेनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नाही.

**4.553 विदयार्थीनीसाठी दोन चाकी लेडील सायकल वाटपाबाबत.**

**पंचायत समिती लाखांदूर, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, लाखांदूर तर्फे सामुदायिक विकास महिला व बाल कल्याण सेस फंड व अभिकरण योजनेअंतर्गत वित्तीय वर्ष 2014-2015 मध्ये रुपये 9,18,225/- चे दोन चाकी लेडीज (पिंक कलर) सायकल वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सायकल दरकरार प्रती नग दर रुपये 3,096/- असतांना पुरवठा आदेश रुपये 3,339/- प्रमाणे दिल्यामुळे 275 नग साठी रुपये 66,825/- जादा खर्च केले आहे.

2) पुरवठा आदेश शर्ती व अटी-9 नुसार 3 टक्के सुरक्षा ठेव रुपये 27,547/- व 2.24 टक्के आयकर रुपये 20,568/- देयकातुन कपात केली नाही.

3) लाभार्थी हिस्सा रुपये 1,20,000/- अदयाप बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे जमा करण्यात आले नाही.

4) डिलीव्हरी मेमो क्रमांक 01 दिनांक 27/03/2015 नुसार 275 सायकल नगाची साठा नोंदवही पान क्रमांक 117 वर नोंद असुन सायकल प्राप्त व वाटप दिनांक नाही.

5) सायकल वाटपाकरीता शाळेचे घरापासुन अंतर 2 किलोमीटर ने अधिक असणे आवश्यक आहे. शाळेचे अंतर जास्त् नमुद करुन 7 लाभार्थींना लाभ दिल्यामुळे रुपये 23,373/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

6) बारावित शिक्षण घेणा-या विदयार्थीनीला सायकल वाटप करणे आवश्यक होते मात्र  बारावी झालेल्या दोन लाभार्थींना लाभ दिल्यामुळे रुपये 3,339/- प्रमाणे रुपये 6,678/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

7) सायकल दर करारनुसार रुपये 3,096/- किमंतीमध्ये चैनकवरचा समावेश असतांना चैनकवर 63 व बास्केट 180 असे एकुण रुपये 243/- प्रमाणे 275 नग सायकल साठी रुपये 66,825/- जादा खर्च केला आहे.

**4.554 मातृत्व अनुदान प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25)** - लेखापरिक्षण वर्ष 2014-2015 मध्ये मातृत्व अनुदान रक्कम संबंधीतास प्रदान केल्यासंबंधीचे दस्ताऐवज उपलब्ध नसणेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 1228, दिनांक 23/03/2015 रुपये 24,800/- बाबत अतिसंवेदनशील आदिवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविणे बाबत 62 मातेला मातृत्व अनुदान प्रदान केले. सदर रक्कम 6 ANM यांचे बँक खाती जमा करण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्ष 62 मातांना रक्कमा प्राप्त झाल्याबाबत खातरजमा होत नाही. केस पेपर व पोचपावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाही.

**4.555 100 टक्के अनुदानावर दोन चाकी सायकल पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती सडक-अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26)** - लेखापरीक्षण वर्ष सन 2014-2015 मध्ये पुरवठाधारक यांनी साहित्याचा पुरवठा हा विलंबाने केला. योजनेचा लाभ हा सन 2014-2015 मध्ये न देता सन 2015-2016 मध्ये देण्यात आला. तसेच लाभार्थ्यांकडून करारनामा सुदधा सन 2015-2016 मध्ये करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर सायकलचा पुरवठा शासन दरकरार मधील अट क्रमांक 16 अन्वये आदेश प्राप्तीचे तारखेपासून 6 आठवडयाचे आत साहीत्याचा पुरवठा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

2) विशेष घटक योजनेमधील कुमारी मयुरी चौखेलाल बडोले, बौदधनगर वर्ग 6 या लाभार्थ्यास यापुर्वी लाभ देण्यात आल्याने व पुन्हा त्याच लाभार्थ्याची निवड करणेबाबत खुलासा करावा.

3) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) त्याच वित्तीय वर्षात लाभ देणे गरजेचे असतांना योजनेचा लाभ सन 2015-2016 मध्ये देण्यात आल्याने सदर लाभ अनुज्ञेय ठरत नाही.

5) करारनामे जुलै 2015 मध्ये केलेले आहेत.

**4.556 90 टक्के सुटीवर सौर कंदील पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27)** -लेखापरीक्षण वर्ष 2014-2015 मध्ये महिला व बालकल्याण विभागांतर्गत साहित्य विलंबाने प्राप्त झाले असल्याने दंडात्मक रक्कम वसुली, लाभार्थी हिस्याची रक्कम, विलंबाने वसुली व एकाच लाभार्थ्याची दोनदा निवड करणेत आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) डिलीव्हरी चालानवर क्रमांक व दिनांक नाही.

2) पुरवठा आदेशानंतर 15 दिवसात पुरवठा न केल्याने दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

3) लाभार्थी निवड यादीतील अनुक्रमांक 6 व 50 वर कुमारी शिल्पा रामजी परशुरामकर राहणार खैरी हीची लाभार्थी नोंद दिसुन आली.

4) लाभार्थी निवडीनंतर 10 टक्के रक्कम वसुल लाभार्थ्यांकडून केली नाही.

5) मास्टर नोंदवही ठेवली नाही, त्यामुळे दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) एका लाभार्थ्यास दुबार लाभ दिल्याने रुपये 1,557/- वसुली होणे आवश्यक आहे.

7) छायाबाई बळीराम हरडे राहणार भुसारीटोला यांनी साहीत्याची उचल केलीनसल्याने एक नग शिल्लक असुन लाभार्थी हिस्याची रक्कम सुद्दधा वसुली होणे बाकी आहे.

8) सन 2014-2015 मधील योजनेचा लाभ सन 2015-2016 मध्ये देण्यात आला त्यामुळे सदर लाभ अनुज्ञेय ठरत नाही.

**4.557 महिला व बालकल्याण अंतर्गत 75 टक्के अनूदानावर पीव्हीसी पाईप पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, हिंगोलीने सन 2014-2015 या वर्षात पंचायत समिती उपकरातुन महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत 75 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील महिला शेतक-यांना पीव्हीसी पाईप पुरवठा करणे योजनेवर रुपये 9,79,633/- खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्रक्र-76/पं.रा.-1, दिनांक 24/01/2014 नुसार महिला व बालकल्याण समितीने राबवावयाचे कार्यक्रम अंतर्गत सदर योजनेचा समावेश नसल्याने योजनेवर केलेला खर्च रूपये 9,37,901/- वसूल पात्र ठरतो.

2) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण, जिल्हा परिषद, हिंगोली यांचे आदेश क्रमांक निरंक दिनांक 14/08/2014 नुसार योजनेस वरील नमूद शासन निर्णयाप्रमाणे तांत्रिक मान्यता शासन आदेशातील नमूद वस्तु खरेदीसाठी देणे आवश्यक असताना चुकीची तांत्रिक मान्यता प्रदान केली. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 126 नुसार दरास मान्यता घेतलेली नाही.

3) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांचे दरकरार असताना त्यांचे दर आणि खरेदी दर यातील तफावत रक्कम रुपये 1,61,460/- वसुल करून उपकर खाती भरणा केला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परीपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57,दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा केला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र झेडपीए 2013/प्रक्र-76/पं.रा.-1,दिनांक 24/01/2014 नुसार एकुण निधीपैकी 50 टक्के निधी गट-अ प्रशिक्षण तर 50 टक्के निधी गट-ब वस्तु खरेदी योजनांवर न राबविता संपुर्ण निधी गट-ब वर खर्च करण्यात आला.

6) पंचायत समितीच्या सन 2013-2014 चे लेखापरिक्षणात वरीलप्रमाणेच महिला व बालकल्याण समितीने राबवावयाचे कार्यक्रमअंतर्गत ओपनवेल सबमर्सीबल पंप पुरवठा या शासन आदेशात समावेश नसलेल्या योजनेवर खर्च केला होता याबाबत सन 2013-2014 च्या लेखापरीक्षणात आक्षेप नोंदवुनही अशा स्वरूपाच्या खर्चाची पुनरावृत्ती शासन आदेशाचा भंग करणारी ठरते.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.872/2 ब,दिनांक 10/10/1996 नुसार कोणतीही वस्तु खरेदी करण्यापुर्वी किती वस्तुंची आवश्यकता आहे याचा आढावा घेतलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्रं.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास 1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी निविदा बोलावण्या पुर्वी खरेदी करण्यापुर्वी पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत लाभार्थी निवड केली नसल्याने विनावाटप शिल्लक नगावरील रुपये 4,710/- वसुलपात्र आहे.

10) आक्षेपात दर्शविल्याप्रमाणे लाभार्थी महिलांची नावे सातबारावर आढळून आली नाही, योजनेचा यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवक यांनी दिले असुन ते प्रमाणीत नाही, पाणी उपलब्ध असले बाबत प्रमाणपत्र तलाठी यांनी दिले असुन पाण्याचा नेमका स्त्रोत कोणता हे नमुद नाही, 7/12 वर सिचंनाचा स्त्रोत आढळून येत नाही, उत्पन्नाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी ऐवजी तलाठी यांचे आहे, लाभार्थी अर्ज अपूर्ण असून साक्षांकीत केलेले नाहीत.

11) साठा नोंदवहीवर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही प्रमाणित ठेवलेली नाही.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये योजनेचा मूळ हेतू सफल झाल्याबाबत सविस्तर पाहणी अहवाल नाही.

13) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्रक्र-76/ पं.रा.-1,दिनांक 24/01/2014 नुसार 3 टक्के अपंग महिलासांठी योजनेचा निधी खर्च करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

**4.558 अंगणवाडी कार्यकर्ते व मदतनिस गणवेश खरेदीबाबत.**

**पंचायत समिती धर्माबाद, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती धर्माबादचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 1,46,400/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

168 अंगणवाडी मदतनिसांपैकी फक्त 37 अंगणवाडी मदतनिसांचे गणवेश खरेदी केल्याबाबत प्रमाणके प्राप्त करून घेतलेली आहेत. उर्वरीत 131 अंगणवाडी मदतनिस यांचे गणवेश खरेदीची प्रमाणके प्राप्त करून घेतलेली नाहीत. त्यामूळे प्रत्यक्षात किती गणवेश खरेदी केले याचा बोध होत नाही.

**4.559 मोठया प्रमाणावर रद्द झालेल्या अंगणवाडी बांधकामाची अखर्चीत रक्कम शासनखाती भरणा न करणे व इतर गंभीर अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, उस्मानाबाद, सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात तपासणी केलेल्या सन 2010-2011 ते 2013-2014 या वित्तीय वर्षातील अंगणवाडी बांधकामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/ अर्थोपाय,दिनांक 06/06/2008 प्रमाणे ज्या वित्तीय वर्षात अनुदान वितरीत केलेले आहे, ते अनुदान लगतच्या वित्तीय वर्षात वापर न झाल्यास शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे. सन 2010-2011 ते 2013-2014 या कालावधीत प्राप्त निधी पैकी रक्कम रुपये 1,12,21,345/- अखर्चीत असल्याचे निदर्शनास आले. अखर्चीत अनुदान रकक्म रुपये 1,12,21,345/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) सन 2010-2011 ते 2013-2014 या वित्तीय वर्षातील मंजूर झालेल्या 123 कामापैकी 45 कामे रद्द केलेली आहेत. यावरुन आवश्यकता नसताना कामे मंजूर केल्याचे स्पष्ट होते. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95(2)(ग) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी व कलम 98(2)(घ) नुसार गट विकास अधिकारी यांनी विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी उपाययोजना केलेल्या नाहीत.

3) सन 2010-2011 ते 2013-2014 या वर्षातील एकूण 9 (नऊ) अपूर्ण कामे असुन त्यावर रक्कम रुपये 23,00,000/- खर्च होऊनही सदर कामे अपूर्ण आहेत. सदरची कामे पूर्ण करणे किंवा त्यावर झालेला खर्च तसेच सदर कामासाठी प्राप्त रक्कम शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) रद्द केलेल्या 7 कामासाठी अग्रीम प्रदान केलेला आहे. तथापि, रद्द केलेल्या कामासाठी प्रदान केलेल्या अग्रीमाची रक्कम वसुल केलेली नाही. प्रदान अग्रीमाची रक्कम रुपये 12,00,000/- वसूली होणे आवश्यक आहे.

5) पंचायत समितीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 244 अन्वये नमुना नंबर 90 अनुदान नोंदवही ठेवलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.560 पंचायत समिती उपकर अंतर्गत 50 टक्के अनुदानावर शिलाई मशीन वाटपातील अनियमितता.**

**पंचायत समिती परंडा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, परंडा द्वारा महिला बालकल्याण अंतर्गत महिलांना 50 टक्के अनुदानावर पंचायत समिती उपकर रक्कमेतून शिलाई मशिन पुरवठा करणेसाठी रक्कम रुपये 97,748/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक, क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्रं.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

2) जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभाग, महिला बालकल्याण विभाग यांचे मार्फत ही याच प्रकारची योजना राबविण्यांत येत असतांना पुन्हा त्याच प्रकारची योजना पंचायत समिती उपकरातून राबविण्यापेक्षा नविन योजनांवर खर्च करणेबाबत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

3) ग्रामविकास विभाग, परिपत्रक, क्रमांक मागास/1089/प्र.क्रं.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, परंतु अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडुन राबविण्यांत आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षीही लाभ दिला गेला नाही हे तपासता आले नाही.

4) ग्रामविकास विभाग, परिपत्रक, क्रमांक पंरास/1096/प्र.क्रं178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुंची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवायची आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार गट विकास अधिकारी, यांनी गुणवत्ता व योग्यतेचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

6) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक परांस/1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांचे मुल्यमापन तीन स्तरावर करण्यांत यावे, परंतु त्या प्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

7) एकूण 13 लाभार्थी महिलांचे शिलाई मशीन प्रमाणपत्रात नांव झेरॉक्स चिठ्ठी लावून लिहीलेले असल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले. बोगस प्रमाणपत्र देवुन शिलाई मशिन वाटप केलेले आहे. तरी संबधीत लाभार्थी महिलांकडून रक्कम रुपये 20,946/- वसुल होणे आवश्यक आहे.

**4.561 रद्द केलेल्या कामामुळे शासन निधीचे नुकसान झालेबाबत.**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती, कळंब, येथे अंगणवाडी बांधकाम योजना (जिल्हा नियोजन समिती) अंतर्गत रद्द केलेल्या 9 कामामुळे शासन निधीचे रुपये 9,62,500/- नुकसान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95(2) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामे रद्द केल्याने त्या कामावर सन 2010-2011, 2011-2012, 2012-2013, 2013-2014 मध्ये वितरीत केलेला निधी निष्फळ ठरला असुन, काम अपुर्ण राहुन त्यानंतर रद्द केल्यामुळे शासन निधीचे नुकसान झालेले आहे.

2) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चीत साहिलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. उपरोक्त कामे रद्द केल्यानंतर त्या कामासाठी वाटप केलेला निधी हा निष्फळ ठरल्याने संबंधित ग्रामपंचायतीकडुन प्रदान केलेल्या रक्कमेची वसुली करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिच्छेद 2 जिल्हा परिषदांकडील हस्तांतरीत योजना (बांधकाम विभाग) योजनाबाबत परिशिष्ट क प्रमाणे वेळापत्रक विहीत करुन प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पुर्ण करावी. तथापी प्राप्त अनुदानातुन

कामावर पुर्णत: खर्च न झाल्याने तसेच कामे पुर्ण न झाल्याने व कालांतराने रद्द केल्याने शासनाच्या योजनांचा जनतेस फायदा होऊ शकला नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.562 व्यपगत निधी नियमबाह्य वापराबाबत.**

**पंचायत समिती वाशी, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, वाशी अंतर्गत सन 2010-2011 ते 2012-2013 मध्ये अंगणवाडी बांधकामे कामे हाती घेण्यात आलेली आहेत व त्यासाठी सन 2014-2015 मध्ये प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंगणवाडी बांधकामासाठी ज्या वित्तीय वर्षात मंजुरी प्राप्त झाली होती त्याच वित्तीय वर्षामध्ये अथवा एक वर्ष वाढीव मुदतीमध्ये काम पुर्ण करुन त्यावर खर्च करणे अपेक्षीत होते, परंतु सन 2014-2015 मध्ये शासनाची मान्यता नसताना खर्च नोंदविण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थानी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. तथापि, पंचायत समितीने नियमबाह्यरित्या सन 2010-11 व 2012-13 मध्ये प्राप्त झालेला व अखर्चित असलेला निधी सन 2014-15 मध्ये नियमबाह्य वापर केलेला आहे. याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट-4, नियम 2 नुसार, प्राप्त अनुदान हे मागील दायित्व व चालु खर्च भागविण्यासाठी असुन, त्यातुन दिनांक 31 मार्च पर्यंत खर्च करता येतो व त्यानंतर अखर्चीत राहिलेली रक्कम व्यपगत होते. अशी अखर्चीत रक्कम शासनास परत करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न करता खर्च केलेला आहे.

3) अनुदान निर्धारण न केल्यामुळे किती अनुदान कोणत्या कामासाठी प्राप्त झाले, त्यातुन किती खर्च करण्यात आला, किती रक्कम शिल्लक आहे, इत्यादी बाबत मेळ घेऊन निश्चित स्थिती दर्शविणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नमूना क्रमांक 61 लेखापालाचे आक्षेप नोंदवही मध्ये अखर्चीत निधी खर्च करण्यास परवानगी प्राप्त नसल्याचे सहायक लेखाधिकारी यांनी नमुद केल्यानंतर गट विकास अधिकारी यांनी नियमबाह्यरित्या देयके पारीत करून अनियमितता केलेली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.563 महिला अभ्यास दौऱ्यासाठी नियमबाहय खर्च केलेबाबत.**

**पंचायत समिती लातूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती लातूरने सन 2014-2015 मध्ये 18- महिला व बालकल्याण अंतर्गत पंचायत समिती उपकरातून महिला सदस्यांची अभ्यास दौरा हा कोल्हापूर जिल्हा परिषद भेट व चर्चा, गणपतीपुळे व व हरिहरेश्वर येथे ग्रामपंचायत भेट, मुरुड जंजीरा ग्रामपंचायत भेट, रायगड जिल्हा परिषद भेट व चर्चा, पंढरपूर व तुळजापूर पंचायत समिती भेट व चर्चा व परत असा कार्यक्रम आयोजनासाठी प्रवास व निवास भोजनासह खर्चासाठी जाहिरात देवून निविदा मागवून कमी दर शिवम ट्रॅव्हल्सला रक्कम रुपये 2,28,878/- प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088/2512 /उद्योग-6,दिनांक 02/01/1992 मधील तरतूदीप्रमाणे निविदा मागविणे बाबत ठरविण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबविणे बंधनकारक असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. निविदा या हातोहात मागविल्याचे दिसून आले. प्राप्त निविदा पाकीटावर आवक क्रमांक प्राप्त निविदा क्रमांक, उघडल्याचा दिनांक, सिलबंद पाकीटे, तुलनात्मक दराचा तक्ता इत्यादी नसल्याने नियमानुसार खरेदीची प्रक्रिया न राबविता नियमबाहय आदेश निर्गमित केले.

2) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता व निविदा मान्यता आदेश इत्यादी पत्रावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नसून घाईघाईने योजना राबवून केवळ अनुदान निष्फळ खर्च केल्याचे यावरुन स्पष्ट होते. अभ्यास दौरा केल्याबाबत फोटो संचिकेत उपलब्ध नसल्याचे दिसून आले नमूद ठिकाणी भेटी व चर्चा करुन विकासाच्या कामाचा फायदा

झाल्याबाबत कुठेही उल्लेख दिसून आला नाही. पंचायत समिती लातूर मध्ये 9 महिला सदस्य असताना एकुण 12 व्यक्तीनी प्रवास व इतर व्यवस्थेवर खर्च केल्याचे दिसून आले. तीन व्यक्तीवर झालेला अनावश्यक जादा खर्च हा वसूलपात्र ठरतो. खुलासा व्हावा व अभ्यास दौऱ्याचा फायदा करुन फलीत झाल्याचे कागदोपत्री खात्री पटवून पूर्तता दर्शवावी.

3) कमी दराची निविदा ही शिवम ट्रॅव्हल्स अँड सर्व्हीसेस लातूरची असताना निविदा मंजूरी आदेश हा शुभम ट्रॅव्हल्स अँड टॅक्सी सर्व्हीसेस लातूर यांना पत्र क्रमांक जा.क्र.एबाविसेयो/कार्या-1/कावि/168/15, दिनांक 19/03/2015 अन्वये नियम बाहय कसा दिला खुलासा होणे आवश्यक आहे.

4) अभ्यास दौऱ्यामध्ये कोणत्या बाबीचा विषयाचा अभ्यास दौरा होता याबाबतचे कागदपत्र संचिकेत दिसून आले नाही. तसेच अभ्यास दौऱ्यासाठी महिला सदस्याची निवड कोणत्या निकषाव्दारे केली व प्रत्यक्ष कोणी प्रवास केला याबाबत कागदपत्राअभावी खात्री करता आली नाही. खात्री पटवून पुर्तता दर्शवावी.

**4.564 ग्रामीण भागातील शालेय मुलीना संगणक क्लास प्रशिक्षण देणे खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती औसा, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती उपकरातून 18 महिला व बालकल्याण अंतर्गत 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील 10 वी, 12 वी उत्तीर्ण मुलीना संगणक क्लास प्रशिक्षण देणे बाबत 119 लाभार्थीना रुपये 3,350/- प्रमाणे रक्कम रुपये 3,98,650/- खर्च केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक ZPA/2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असुन योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता 30 जुनपर्यत, लाभार्थी निवड 31 मेपर्यंत, निवीदा प्रक्रिया 31 ऑगस्टपर्यंत, पुर्ण करुन साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे 30 सप्टेबरपर्यंत, लाभार्थ्यांना साहित्य वाटप 30 नोंव्हेबरपर्यंत, पुरवठादाराचे देयक अदा करणे 31 जानेवारीपर्यंत व विनियोगाचे दाखले मार्च अखेरपर्यंत प्राप्त करावयाचे आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा यांनी तांत्रिक मंजुरी आदेशावर स्वाक्षरी केली नाही म्हणजेच तांत्रिक मंजुरी नसताना खर्च केला आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 20/10/1999 नुसार लाभार्थींची निवड ग्रामपातळीवर ग्रामसभेतून होणे आवश्यक होते. परंतू अशी निवड झाल्याची खात्री लेख्या अभावी करता आली नाही. योजनेचा लाभ देणेपुर्वी पात्र लाभधारकांची निवड होऊन त्या यादीस पंचायत समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

4) एकाच लाभधारकास पुन्हा लाभ दिला जाणार नाही यासाठी पंचायत समिती स्तरावर लाभ देण्यात आलेल्या लाभधारकांची गाववार नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परतू अशी कार्यवाही कार्यालयाकडून न झाल्याचे दिसून येते.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.514/वित्त-9,दिनांक 20/11/2009 अन्वये निविदेची रक्कम 10 लक्ष पर्यंत असेल तर रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखासाठी रुपये 100/- व जास्तीत जास्त रुपये 5 लक्ष पर्यंत मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक आहे त्यानुसार रुपये 100/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु पंचायत समितीने तशी कार्यवाही केलेली नाही त्यामुळे शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे ते वसूल करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 108 (1) मधील क (1) (2) नुसार गटविकास अधिकारी यांनी विकास योजनांचा कृती आराखडा योग्यरित्या तयार करुन त्याची अमलबजावणी काटेकोरपणे पार पाडणे आवश्यक होते. तथापी सदर योजना राबविण्यात आली असताना कृती आराखडा ढोबळ स्वरुपाचा असल्याचे स्पष्ट होते.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 अन्वये तात्काळ संवितरणासाठी आवश्यक असल्याखेरीज रक्कम आहरण करता येत नाही. प्रशिक्षण आदेश, दिनांक 13/05/2015 चे असून प्रशिक्षण पुर्ण होण्यासाठी (90 तास रोज 1 तास प्रमाणे) 13/06/2015 पर्यंतचा अवधी लागला असता म्हणजेच प्रशिक्षण पुर्ण होण्यापूर्वीच कोणतीही खात्री न करता व परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र नसताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 51 (3) मधील तरतुदीनुसार आहरण व प्रदान केलेले आहे.

8) प्रथम लाभार्थी निवड करून लोकवाटा जमा केल्यानंतर आदेश देणे आवश्यक असताना लोकवाटा जमा नसताना संगनाक प्रशिक्षण आदेश देण्यात आले आहेत.

9) रक्कम प्राप्त झालेबाबत संबंधीताची पोच पावती नाही.